# गुरू महाराज

गुरू महाराज गुरू जय जय दत्तराज सद्गुरू
गुरू महाराज गुरू काय मी तुम्हांविण करू
गुरू महाराज गुरू ||१||

गुरू महाराज गुरू जय जय श्रीवल्लभ सद्गुरू
माऊली तुम्ही माझी आहे मी तुमचे लेकरू
गुरू महाराज गुरू ||२||

गुरू महाराज गुरू जय जय स्वामीराज सद्गुरू
प्रिय स्मरण तुम्हां इतुके ते झाले गिरनार मेरू
गुरू महाराज गुरू ||३||

गुरू महाराज गुरू जय जय परब्रह्म सद्गुरू
स्मृतीत वसता म्हणूनी भजनी जीवन द्या हे सरू
गुरू महाराज गुरू ||४||

– नारायण
श्रावण १, शके १९४५
(०८/१७/२३)
खिद्रापूर, जयसिंगपूर, नरसोबा वाडी, औदुंबर